# Two Days Training

## "Personal Effectiveness For Enhancement of Day to Day Work"

## for Supporting Staff (14th & 15th February 2019)

## at SPCE

ORGANIZED BY

**भारतीय विद्या भवनचे**

**सरदार पटेल अभियांत्रिकी महाविद्यालय**

**मुन्शी नगर, अंधेरी -पश्चिम, मुंबई - ४०० ०५८.**

सरदार पटेल अभियात्रिंकी महाविद्यालय ( Mentor Institute ) व रेवा अभियात्रिंकी महाविद्यालय, रेवा (M.P.) (Mentee Institute) हयांच्या संयुक्त विद्यमाने दिंनांक १४ व १५ फेब्रुवारी २०१९ हया दरम्यान TEQIP – III अंतर्गत "**Personal Effectiveness For Enhancement of Day to Day Work**" हया विषयावर शिक्षकेत्तर कर्मचा-यासांठी दोन दिवसीय कार्यशाळेचे आयोजन सरदार पटेल अभियांत्रिकी महाविद्यालयातील सेमिनार हॉल (रुम नं. ११९) मध्ये करण्यात आले होते. या कार्यशाळेचे आयोजन C.C.E. अंतर्गत TEQIP- III च्या माध्यमातुन करण्यात आले. हया कार्यशाळेत सरदार पटेल अभियांत्रिकी महाविद्यालयातील २१ शिक्षकेत्तर कर्मचारी व रेवा अभियांत्रिकी महाविद्यालयातील ०४ शिक्षकत्तर कर्मचारी उपस्थित होते.

कार्यशाळेचे उद्घाटन संस्थेचे उपप्राचार्य व स्थापत्य विभाग प्रमुख डॉ. एम.एम.मुरुडी सर, महाविद्यालयाचे डीन ॲकडेमीक डॉ राजेश बी. बुक्तार, व यांत्रिकी विभागाचे विभाग प्रमुख डॉ. निलेश रायकर यांनी केले.



कार्यक्रमाचे प्रास्ताविक सौ. निलम यो. वैती मॅडम (विद्यार्थी विभाग) यांनी केले तद्‌नंतर मान्यवरांच्या हस्ते दिपप्रज्वलन करण्यात आले दिपप्रज्वलन होत असताना सरस्वती वंदना करण्यात आली त्यासाठी श्री. निलेश वि. केळकर, सौ. निलम यो. वैती, व सौ. समिधा स. वालावलकर यांची साथ लाभली.





दिपप्रज्वलनानंतर श्री. निलेश वि. केळकर (जोडारी निदेशक) यांनी मान्यवरांची ओळख करुन देत उपस्थित शिक्षकेत्तर  कर्मचा-यांच्या  हस्ते सर्व मान्यवरांचे तुळशीचे रोप देऊन स्वागत केले. आपल्या स्वागतपर भाषणात डॉ. मुरुडी सर म्हणाले की, शिक्षकेत्तर कर्मचा-यांनी  Mentee Institute  बरोबर आयोजित केलेला हा पहिलाच कोर्स असून हया कोर्सच्या आयोजनाबद्दल आयोजकांना धन्यवाद दिले व अश्याच प्रकारचे कोर्स रेवा (M.P.) ने देखिल करावेत असे सांगितले.





डॉ. राजेश बी. बुक्तार सर यांनी अशा प्रकारचा कोर्स Mentee Institute बरोबर घडवून आणल्याबद्दल सर्व शिक्षकेत्तर कर्मचा-यांचे अभिनंदन केले व आपणही रेवा (M.P.) महाविद्यालयात जावे व रेवाच्या कर्मचा-यांबरोबर सहभाग घ्यावा असे सांगितले.




नंतर डॉ. निलेश रायकर यांनी सर्व आयोजकांना धन्यवाद दिले व रेवा (M.P.) मधील कर्मचारी या कोर्समध्ये सहभागी झाल्याबद्दल त्यांचे संस्थेच्या वतीने स्वागत केले व या कोर्ससाठी शुभेच्छा दिल्या .



कार्यशाळेच्या पहिल्या सत्रात सौ. मोना मॅडम यांनी " Emotions at work place" हा भावनांवर आधारीत कार्यशाळा घेतली. त्यामध्ये भावना कशा निर्माण होतात ? त्यांच्यावर कसे नियंत्रण ठेवायचे ? हया साठीची तंत्रे नीट समजावून दिली आपल्या दैनदिन कामाच्या ठिकाणी भावनांचे नियंत्रण कसे करावे ? व का करावे ? यावर वेगवेगळया Activity व्दारे चर्चा केल्या.










दुस-या दिवशीच्या पहिल्या सत्रात श्री. लुईस पी. डायस, इंजिन परिचर यांत्रिकी विभाग यांनी सकारात्मक दृष्टीकोन (Positive Attitude ) हया सदंर्भात मार्गदर्शन केले. प्रत्येक व्यक्तीशी आपल्या कुंटुंबाशी, कामाच्या ठिकाणी काम करताना नेहमी सकारात्मक दृष्टीकोन बाळगला तर काम करण्यास कोणतीही अडचण येणार नाही हे निरनिराळया उदाहरणाव्दारे व व्हिडिओ क्लीपव्दारे दाखवून दिले.






दुस-या दिवशीच्या  सत्रात श्री. संजय जे. सावंत, ग्रंथपाल यांनी कार्यालयीन कामकाजात सहकार्याचे महत्व आपल्या सादरीकरणात पटवून दिले.





आपले व्यक्तिमत्व अधिक प्रभावशाली व्हावे, व त्यामुळे आपले आयुष्य आरोग्य, यशाने व आनंदाने सहज भरुन जावे असे प्रत्येकाला वाटते ते नमके कसे करावे ? हे या कार्यक्रमात श्री. अनिल पाटील यांनी त्यासाठीची तंत्रे नीट समजावून सांगितली व यश, आरोग्य, आंनदासाठी कोणत्या ७ सवयी अंगी बाळगाव्यात हे विस्ताराने व व्हिडिओ क्लिपिंग व्दारे स्पष्ट करुन सांगितले त्याचा फायदा सहभागी झालेल्या सर्वाना निश्चित होईल अशी अपेक्षा.




समारोपाच्या कार्यक्रमात टेक्युप समन्वयक डॉ.राहुल तु. दहातोंडे यांनी या कार्यशाळेमुळे सर्वाची गुणवत्ता निश्चित वाढेल व असे कार्यक्रम नियमित झाल्याने त्याचा उपयोग आपल्या दैनदिन कार्यात होईल असा विश्वास व्यक्त केला. यामध्ये रेवा महाविद्यालय सामील झाल्यामुळे त्यांना ही फायदा होईल असे ते म्हणाले.




कार्यक्रमाच्या समन्वयक सौ. व्ही. पी. जोशी यांनी आपण करत असलेले प्रत्येक काम मनापासून केल्यास त्यामधून सकारात्मक उर्जा मिळून ते काम परिपूर्ण होते व मग आपण आपल्या कामात आनंद व समाधान शोधू लागतो  असे उपस्थित असलेल्या कार्यशाळेतील सहभागी शिक्षकेत्तर कर्मचा-यांना सांगितले.




या कार्यक्रमासाठी श्री. लुईस पी. डायस यांनी अभ्यासक्रम समन्वयक व श्री. निलेश वि. केळकर, सौ. निलम यो. वैती ,  सौ. समिधा स. वालावलकर यांनी अभ्यासक्रमाचे आयोजक म्हणून काम पाहीले.





